TAU/ICD/2020-21/689

# मुंबई विद्यापीठ

**परिपत्रक:**

विद्यापीठाचे विविध विभाग/केंद्र/संस्था येथील संचालक/विभागप्रमुख/समन्वयक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे उपकेंद्र, स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड अप्लाइड सायन्सेस, कल्याण, मुंबई विद्यापीठ ग्रंथपाल, संचालक विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, केंद्र यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या विविध विभागातील हंगामी/अस्थायी शिक्षक कर्मचाऱ्यांची नेमणूक विद्यापीठ प्रशासनाच्या आदेशान्वये फक्त AAQA विभागामार्फत नियमानुसार अधिकृतरित्या करण्यात येतात. मात्र विद्यापीठ प्रशासनाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, विद्यापीठ प्रशासनाच्या पूर्व परवानगीशिवाय तसेच AAQA विभागाच्या अधिकृत कार्यालयीन आदेशाशिवाय करण्यात येत आहेत. तरी, याद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, विद्यापीठ प्रशासनाच्या पुर्व परवानगीशिवाय व AAQA विभागाच्या अधिकृत कार्यालयीन आदेशाशिवाय कोणीही विभागात/संस्थेत परस्पर हंगामी शिक्षकांची नेमणूक करू नये. तसे केल्यास ती बाब विद्यापीठ प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन समजण्यात येईल व त्या संबधित शिक्षकाच्या वेतनाबाबतची व इतर कोणतीही जबाबदारी विद्यापीठ प्रशासनाची राहणार नाही. तसेच नेमणूक केल्यास सदर नेमणूकीची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागप्रमुख/ संचालक/समन्वयक/शिक्षक कर्मचारी यांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

प्रति,

विद्यापीठाचे विविध विभाग/केंद्र/संस्था येथील संचालक/विभागप्रमुख/समन्वयक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे उपकेंद्र, स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड अप्लाइड सायन्सेस, कल्याण, मुंबई विद्यापीठ ग्रंथपाल, संचालक विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अंबाडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, केंद्र.